गडहिंग्लज नगरपरिषद, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

## जाहीर सुचना

मा.राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्र.रानिआ/न.प.२०१६ /प्र.क्र.०७ /का-०६ दिनांक ०७/०५/२०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) (यापुढे 'सदर अधिनियम' म्हणून संबोधित केला) चे कलम १०(१) नुसार मा. आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे यांचेकडील राजपत्र दि. ३०/०७/२०१९ अन्वये सोबतच्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे गडहिंग्लज नगपरिषदेचे क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करणेसाठी आणि मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचेकडील क्रमांक रानिआ/न.पा.2016/प्र.क्र. 10/का.06, दि.15/06/2016 च्या पत्रासोबत हद्दवाढ क्षेत्राची प्रभाग रचना करण्याबाबतचे नियमाआधारे ज्या प्रभागामध्ये .अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनु.जाती, अनु.जमाती आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या स्त्रियांसह)जागा राखून ठेवण्यात येतील ते भाग निर्दीष्ठ करण्यात आले आहेत.

सदर अधिनियमाच्या कलम १० पो.क.(१) च्या परंतुकाप्रमाणे आवश्यक असल्यामुळे उक्त आदेशाचा मसुदा याद्वारे गडहिंग्लज नगरपरिषद हद्द व हद्दवाढ क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, गडहिंग्लज नगरपरिषद कार्यालय व गडहिंग्लज नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक वर्दळीच्या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत असुन याद्वारे सुचना देण्यात येते की, उक्त आदेशाचा मसुदा दि. 21 /08/2019 ( बुधवार) नंतर विचारात घेण्यात येईल.

उक्त आदेशाच्या मसुदयास ज्या लोकांच्या हरकती असतील त्यांनी त्या हरकती सकारण मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद कार्यालयात दिनांक 27/08/2019 रोजी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत लेखी सादर करावेत. उक्त दिनांकानंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घेणेत यावी.

स्थळ – कोल्हापूर.
दिनांक - 21/08/2019

जिल्हाधिकारी कोल्हापूर
जि. कोल्हापूर

(दौलत देसाई)
जिल्हाधिकारी, कोल्हापूर



Scanned by CamScanner